विधि व न्याय विभाग (खुद्द) च्या आस्थापनेवरील गट-ब (अराजपत्रित), गट-क आणि गट-ड च्या पदांची सरळसेवा, पदोन्नती व प्रतिनियुक्तीने नियुक्ती करण्यासंदर्भात नियुक्ती प्राधिकारी घोषित करणेबाबत.

महाराष्ट्र शासन
विधि व न्याय विभाग
शासन निर्णय क्र. इएसटी-२०१८/प्र.क्र.५४/कार्यासन-२
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.
तारीख : २४ मे, २०१८

<u>वाचा:</u> सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय क्र.एसआरव्ही-२०१६/प्र.क्र.२९०/कार्या-१२, दिनांक १९.११.२०१६.

<u>प्रस्तावना:</u>

गट-अ आणि गट-ब (राजपत्रित) अधिकाऱ्यांच्या तसेच गट-ब (अराजपत्रित), गट-क आणि गट-ड मधील कर्मचाऱ्यांच्या सरळसेवेने, पदोन्नतीने वा प्रतिनियुक्तीने नेमणूका/पदस्थापना करताना संबंधित प्रकरणी कोणत्या स्तरावर अंतिम निर्णय घ्यावेत या अनुषंगाने सामान्य प्रशासन विभागाने दिनांक १९.११.२०१६ च्या शासन निर्णयान्वये नियुक्ती प्राधिकारी घोषित केले आहेत. तसेच गट-ब (अराजपत्रित), गट-क आणि गट-ड मधील पदांवर सरळसेवेने, पदोन्नतीने व प्रतिनियुक्तीने करावयाच्या नेमणुका/ पदस्थापनेच्या प्रकरणांवर अंतिम निर्णय घेण्यासाठी नियुक्ती प्राधिकारी कोण असतील यासंदर्भात संबंधित प्रशासकीय विभागांनी पदनिहाय नियुक्ती प्राधिकाऱ्यांचे पदनाम स्वतंत्र आदेशान्वये घोषित करण्याबाबत कळविले आहे. या अनुषंगाने विधि व न्याय विभाग (खुद्द) च्या आस्थापनेवरील गट-ब (अराजपत्रित), गट-क आणि गट-ड च्या पदांवरील सरळसेवेने, पदोन्नतीने वा प्रतिनियुक्तीने नियुक्ती करण्यासंदर्भात नियुक्ती प्राधिकारी घोषित करण्याची बाब विचाराधीन होती.

शासन निर्णय:-

मंत्रालयीन प्रशासकीय विभागातील गट-ब(अराजपत्रित) व गट-क मधील (वाहन चालक वगळता) इतर सर्व पदांसाठी नियुक्ती प्राधिकारी हा सामान्य प्रशासन विभाग आहे. त्यामुळे विधि व न्याय विभाग (खुद्द) च्या आस्थापनेवरील गट-ब(अराजपत्रित) व गट-क मधील (वाहनचालक वगळता) इतर सर्व पदांसाठी नियुक्ती प्राधिकारी हा सामान्य प्रशासन विभाग असेल.

२. विधि व न्याय विभाग (खुद्द) च्या आस्थापनेवरील गट-ब(अराजपत्रित), गट-क (वाहनचालक) व गट-ड च्या पदांवर सरळसेवेने, पदोन्नतीने वा प्रतिनियुक्तीने नियुक्ती करण्यास सक्षम असणारे प्राधिकारी पुढीलप्रमाणे घोषित करण्यात येत आहेत.

अ.क्र.	पदे	नियुक्ती प्राधिकारी
१	विधि व न्याय विभाग (खुद्द) च्या आस्थापनेवरील रु.९३००-३४८००+ ग्रेड पे ४३०० या सहाव्या वेतन आयोगाच्या वेतनश्रेणीतील सहायक (विधि) या पदावर सरळसेवेने, पदोन्नतीने वा प्रतिनियुक्तीने करावयाच्या नेमणुका/ पदस्थापनेची प्रकरणे.	प्रधान सचिव व विधि परामर्शी
२	विधि व न्याय विभाग (खुद्द) च्या आस्थापनेवरील रु.५२००-२०२००+ ग्रेड पे १९०० या सहाव्या वेतन आयोगाच्या वेतनश्रेणीतील वाहन चालक या पदावर सरळसेवेने, पदोन्नतीने वा प्रतिनियुक्तीने करावयाच्या नेमणुका/ पदस्थापनेची प्रकरणे.	प्रधान सचिव व विधि परामर्शी
३	विधि व न्याय विभाग (खुद्द) च्या आस्थापनेवरील रु. ४४४०-७४४०+ ग्रेड पे १३०० या सहाव्या वेतन आयोगाच्या वेतनश्रेणीतील शिपाई या पदावर सरळसेवेने, पदोन्नतीने वा प्रतिनियुक्तीने करावयाच्या नेमणुका/ पदस्थापनेची प्रकरणे.	प्रधान सचिव व विधि परामर्शी
४	विधि व न्याय विभाग (खुद्द) च्या आस्थापनेवरील रु. ४४४०-७४४०+ ग्रेड पे १६०० या सहाव्या वेतन आयोगाच्या वेतनश्रेणीतील हवालदार/ नाईक/ अलमारी परिचर/ फायलर/ झेरॉक्स ऑपरेटर/ रोनियो चालक या पदावर सरळसेवेने, पदोन्नतीने वा प्रतिनियुक्तीने करावयाच्या नेमणुका/ पदस्थापनेची प्रकरणे.	प्रधान सचिव व विधि परामर्शी

३. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेतांक २०१८०५२५११२८३७६३१२ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Akusing Narshi Vasave

Digitally signed by Akusing Narshi Vasave
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Law and Judiciary, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=5ab84183e07eb916b3161523e73f56110b7dfcea4b15e66c8dac75aa76eaad47, cn=Akusing Narshi Vasave
Date: 2018.05.25 11:26:44 +05'30'

(आ. न. वसावे)

सह सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत,

१. मा.राज्यपाल यांचे सचिव, राजभवन, मलबार हिल, मुंबई
२. मा.मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव

३. सर्व मा.मंत्री/ मा.राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव
४. मा.विरोधी पक्षनेता, विधानपरिषद/ विधानसभा, विधानभवन, मुंबई
५. सर्व मा.संसद सदस्य/विधानमंडळ सदस्य, महाराष्ट्र राज्य, मुंबई
६. मा.मुख्य सचिव, महाराष्ट्र राज्य
७. सर्व मंत्रालयीन विभाग
८. प्रबंधक, मूळ शाखा/अपील शाखा, मा.उच्च न्यायालय, मुंबई, औरंगाबाद व नागपूर
९. प्रबंधक, लोकायुक्त आणि उपलोकायुक्त यांचे कार्यालय, मुंबई
१०.सचिव, महाराष्ट्र लोकसेवा आयोग, मुंबई
११.प्रधान सचिव, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय (विधानसभा), मुंबई
१२.प्रधान सचिव, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय (विधानपरिषद), मुंबई
१३.महालेखापाल, महाराष्ट्र-१ (लेखा व अनुज्ञेयता), महाराष्ट्र राज्य,मुंबई / नागपूर
१४.महालेखापाल, महाराष्ट्र-१ (लेखा परीक्षा), महाराष्ट्र राज्य,मुंबई / नागपूर
१५.अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई
१६.निवासी लेखापरीक्षा अधिकारी, मुंबई
१७.सर्व सह/ उप / अवर सचिव/ कक्ष अधिकारी, विधि व न्याय विभाग, मंत्रालय
१८. सह सचिव, विधि व न्याय विभाग, नागपूर/ औरंगाबाद
१९.सामान्य प्रशासन विभाग/ कार्या.१२, मंत्रालय, मुंबई
२०.निवड नस्ती/ गोपनीय सहायक.